अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. १४ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १६४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## पंढरीत कोयत्यांचा सुळसुळाट

**पंढरपूर** : भर रस्त्यावर प्रदक्षिणा मार्गावरील जय भवानी चौकात एका युवकावर कोयत्याने हल्ला केल्याची घटना सोमवारी रात्री घडली. यामुळे या परिसरात एकच खळबळ उडाली होती. सलग दुसऱ्या दिवशी पंढरपुरात कोयत्याने वार केल्याची घटना घडली आहे. पुण्यात कोयता गँग यांची दहशत होती.

मात्र पंढरपुरात प्रत्यक्षात माणसांवर कोयते चालायला लागले आहेत. सलग दुसऱ्या दिवशी पंढरपुरात कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. यामुळे शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या हल्लूयामध्ये पंढरपूर तालुक्यातील अर्जुनसोंड येथील निखिल कांतीलाल कांबळे वय २३ हा तरुण जखमी झाला असून त्याच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महाद्वार चौकाच्या नजीक जय भवानी चौक असून सोमवारी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास निखिल कांबळे याच्यावर हा हल्ला झाला. तीन अज्ञात तरुणांनी निखिल याच्या हातावर, पाठीवर कोयत्याने वार करून ते तेथून पसार झाले.

घटनास्थळी मोठ्या प्रमाणात रक्त सांडले होते. अचानक झालेल्या या घटनेमुळे या परिसरातील व्यापारी व वारकरी यांच्यामध्ये घबराहट पसरली होती. अनेकांनी आपली दुकाने बंद केली. तीर्थक्षेत्र असणाऱ्या पंढरपूरला गुंडगिरी नवीन नाही. यापूर्वी अनेक हत्यारे बंदुका येथे सरास चालत होते. मात्र मध्यंतरी तीर्थक्षेत्र असणारे गाव शांत झालं होतं, मात्र आता पुन्हा प्रदक्षिणा मार्गासारख्या धार्मिक जागांवर देखील कोयत्याने हल्ले होऊ लागले आहेत ही चिंचेची बाब मानली जात आहे. दरम्यान हा हल्ला कोणत्या कारणामुळे झाला याबाबत अद्याप माहिती मिळाली नसून शुभम लकेरी (रा. पंढरपूर) याच्यासह २ आरोपींचा शोध पोलीस घेत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांनी दै सुराज्यशी बोलताना सांगितली.

# दिग्दर्शक 'भाऊ'ने दिला, तरुणीला 'कास्टिंग काऊच'चा 'धक्का'

सुराज्य/सोलापूर

**चित्रपट 'भाऊचा धक्का', त्याची कार्यशाळा होती गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात उस्मानाबादजवळच्या येडशी या गावी. त्या कार्यशाळेला आलेल्या एका तरुणीवर चित्रपटाच्या दिग्दर्शक भाऊची पडली नजर. मग त्या पट्ट्याने त्या तरुणीला चित्रपटात चांगला रोल देण्याची दाखवले आमिष. तिला स्वत:च्या खोलीवर बोलावून घेतले. मोठी अभिनेत्री व्हायचे असेल तर ' हे ' सहन करावेच लागेल, असे सांगून त्याने केली तिच्याशी लगट. तब्बल सहा महिने हा प्रकार चालूच होता. शेवटी ती तरुणी वैतागली. तिने धाडस करून पांगरी (ता. बार्शी) पोलीस ठाणे गाठले आणि दिग्दर्शक भाऊवर 'कास्टिंग काऊच'प्रकरणी बलात्काराची फिर्याद दिली.**



### कार्यशाळा येडशीला, मुक्काम उक्कडगावला

गेल्या वर्षी म्हणजे २० सप्टेंबर २०२२ रोजी 'भाऊचा धक्का' या चित्रपटाची कार्यशाळा येडशी(जि. उस्मानाबाद) येथे सुरू होती. त्यावेळी चित्रपट कंपनीचा मुक्काम हा उक्कडगाव (ता. बार्शी, जि. सोलापूर) येथील एका महाविद्यालयाच्या प्रांगणात होता. अत्याचारग्रस्त तरुणी ही पालघर येथून या चित्रपटाच्या कार्यशाळेसाठी येडशीला आली होती. कार्यशाळा संपल्यानंतर दिग्दर्शक संजय पाटील याने कास्टिंग काऊचजा हा प्रकार संबंधित तरुणीसोबत केला.

### असे झाले कास्टिंग काऊच

चित्रपट कंपनीचा मुक्काम असलेल्या उक्कडगाव येथील महाविद्यालयाच्या प्रांगणातील खोलीवर दिग्दर्शक संजय पाटील याने पीडित तरुणीला बोलावून घेतले. त्याठिकाणी पहिल्यांदा त्याने तिच्याशी स्वत:च्या लगट करायला सुरुवात केली. तुला चित्रपटात चांगली भूमिका देता, त्यासाठी तुला हे सारे करावेच लागेल, असे आमिष दाखवून तिच्यावर दबाव टाकला. त्यानंतर त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

### कामाची गरज म्हणून सहन केला अत्याचार


दरम्यान, अत्याचारग्रस्त तरुणीला चित्रपटातील कामाची गरज होती. जर तिने तक्रार केली असती तर दिग्दर्शक भाऊने तिला चित्रपटातून काढून टाकले असते. या दबावाखाली तिने यासंदर्भात तक्रार करण्याचे धाडस केले नाही. मात्र दिग्दर्शक भाऊचा अत्याचार वाढतच चालल्याने शेवटी वैतागून तिने पांगरी पोलीस ठाणे गाठले आणि फिर्याद दिली. मात्र अद्याप आरोपीला अटक झाली नाही.

संजय उत्तमराव पाटील ((वय ५०, रा. गणराज कॉलनी, सन फार्माजवळ, बोलेगाव फाटा, नागापूर एमआयडीसी, अहमदनगर)) असे त्या दिग्दर्शक भाऊचे नाव आहे. 'भाऊचा धक्का' असे त्याच्या चित्रपटाचे नाव असून हा संपूर्ण प्रकार उक्कडगाव (ता. बार्शी) येथील एका महाविद्यालयाच्या परिसरात घडला आहे. अत्याचारग्रस्त तरुणी ही मूळची माढा तालुक्यातील असून सध्या ती पालघर परिसरात राहते. चित्रपटाच्या कार्यशाळेसाठी ती येडशी येथे आल्यानंतर हा प्रकार घडला आहे.

याप्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून सहाय्यक निरीक्षक जायपत्रे पुढील तपास करीत आहेत.

## दहा हजारांची लाच घेताना तलाठ्याला घरातून अटक

सुराज्य/कुर्डूवाडी



दहिवली (ता.माढा) येथील सामाईक शेतजमिनीची फोड करण्याकरिता दहिवलीतील तलाठ्याने ३० हजार रुपयांची लाचेची मागणी केली होती. यातील पहिला हप्ता १० हजार रुपयांची लाच घेताना तलाठ्याला लाचलुचपत अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले.

ही घटना दि.१३ रोजी दु.३.३० वा सुमारास तलाठ्याच्या कुर्डूवाडी येथील निवासस्थानी कारवाई केली. त्या तलाठ्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. सहदेव शिवाजी काळे (वय ५४ तलाठी सज्जा दहिवली ता.माढा) असे अटक करण्यात आलेल्या तलाठ्याचे नाव आहे. दहिवली ता.माढा येथील तक्रारदाराची सामाईक शेतजमीन असून शेतजमिनीची फोड करून विभक्त करण्याकरिता तक्रारदार यांनी सज्जा कार्यालय दहिवली येथे अर्ज दाखल केला होता. सदर अर्जानुसार शेतजमिनीची फोड करून विभक्त करण्याची कार्यवाही करण्यासाठी व त्याबाबत सातबारा उतारा देण्याकरिता तलाठ्याने तक्रारदार यांच्याकडे ३५ हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ३० हजार स्वीकारण्याचे मान्य करून त्यातील पहिला हप्ता १० हजार रुपये लाच रक्कम त्याने कुर्डूवाडी येथील निवासस्थानी स्वीकारले असताना त्यांना लाचलुचपत अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले.

ही कारवाई लाचलुचपत पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या पथकातील पो.नि.चंद्रकांत कोळी, पो. अं.पकाले, जाधव, सण्णके, चालक पो. शि. सुरवसे यांनी केली. या लाचलुचपत पथकांच्या कारवाईमुळे लाच घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर जरब बसणार आहे.

## चिमणीप्रकरणी योग्यवेळी आदेश : आयुक्त

**सोलापूर** : सिद्धेश्वर कारखाना चिमणी प्रकरणाची सुनावणी आपण पूर्ण केली आहे. आदेश पारित करणे ही माझी जबाबदारी आहे. योग्य वेळी या प्रकरणी आदेश पारित केला जाईल, असे महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी सांगितले.



सिद्धेश्वर कारखाना चिमणी सुनावणी क्लोज करून महापालिका आयुक्तांनी अंतिम निर्णय मात्र राखून ठेवला आहे. तीन, साडेतीन महिन्यांपासून निर्णय न दिल्याने विकासमंचच्यावतीने पुन्हा आयुक्तांना स्मरण करण्यात आले. यावेळी केतन शहा म्हणाले की, आतापर्यंत जनता दरबार असताना आम्ही दर सोमवारी आयुक्तांना चिमणीच्या निर्णयाबद्दल विचारत आहोत. मात्र त्यांच्याकडून काहीही उत्तर येत नाही. सुनावणी संपवून तीन-चार महिने झाले, आतापर्यंत निर्णय येणे अपेक्षित आहे. याबाबत पत्रकारांनी आयुक्तांना विचारले असता त्यांनी चिमणी प्रकरणी योग्य वेळी आदेश पारित केला जाईल, असे सांगितले. तत्कालीन आयुक्त शिवशंकर यांच्या कार्यकाळात सुनावणीला तारीख मिळत गेली. आता नूतन आयुक्त तेली-उगले यांच्यासमोर अंतिम सुनावणी सुनावणी झाली. मात्र अद्याप त्यांनी कोणताही निर्णय दिला नाही.

## रस्ता ओलांडताना ट्रकची धडक; मोहोळमधील व्यापाऱ्याचा जागीच मृत्यू

सुराज्य/मोहोळ



रस्ता ओलांडताना मालट्रकची धडक बसून झालेल्या अपघातात मोहोळ येथील भांडी व्यापाऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवार १०.४५ वा सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील मोहोळ शहरा नजीक असलेल्या नरखेड पुलाजवळ झाली.

राजेंद्र पमुलाल उपाध्ये (वय ५५ रा समर्थ नगर मोहोळ) असे मृत व्यापाऱ्याचे नाव आहे. मोहोळ पोलिसां कडून मिळालेल्या माहिती नुसार, जैन समाजाचा महत्त्वाचा असा महावीर जयंती सोहळा जवळ आला आहे. राजेंद्र उपाध्ये व त्यांचे सहकारी मित्र जेवण करून येत होते. उपाध्ये हे ॲक्टिवा नंबर एम एच १३ डीएच ८०६८ वरून रस्ता ओलांडताना सोलापूरच्या दिशेने भरधाव येणाऱ्या मालट्रक क्र केए ३३/ बी १२१९ हिने उपाध्ये यांना जोराची धडक दिली. मालट्रक अंगावरून गेल्याने उपाध्ये यांचा जागीच मृत्यू झाला. मृत उपाध्ये यांचे येथील मुख्य रस्त्यावरील आंबेडकर चौकात भांडी विक्रीचा व्यवसाय आहे. अचानक झालेल्या या अपघातामुळे मोहोळ येथील जैन समाजावर दुःखाचे सावट पसरले आहे. या अपघाताची फिर्याद मयताचा मुलगा प्रीतम राजेंद्र उपाध्ये (वय ३०) यांनी पोलिसात दिली असून, अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक ज्योतिबा पवार करीत आहेत.

## भारत-ऑस्ट्रेलियात रंगणार वर्ल्ड टेस्टची फायनल

**मुंबई** : कसोटी क्रिकेटचा विश्वचषक म्हणजेच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप. या अंतिम सामन्यात दुसऱ्यांदा भारतानं एन्ट्री मिळवली आहे. यंदा भारतासमोर ऑस्ट्रेलियाचं आव्हान असणार आहे. २०२१ साली न्यूझीलंडविरुद्ध फायनल गमावल्यावर यंदा पुन्हा एकदा भारताला हा चषक जिंकण्याची संधी आहे. भारत व ऑस्ट्रेलिया यांच्यातील मालिकेतील अखेरचा सामना अनिर्णीत सुटला असला तरी श्रीलंकेला न्यूझीलंडनं पराभूत केल्यामुळे भारत गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी मजबूत स्थितीत असल्याने भारत फायनलमध्ये एन्ट्री मिळवली आहे.




### मंगळवेढ्याच्या माजी नगराध्यक्षांच्या पतीचा प्रताप

## महिला वैद्यकीय अधिकाऱ्याला कपडे काढून चप्पलने मारण्याची धमकी

सुराज्य/सोलापूर


मंगळवेढा येथील ग्रामीण रुग्णालयात उशिरा आलेल्या महिला वैद्यकिय अधिकाऱ्याला खालच्या पातळीवर शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी सोमनाथ माळी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची घटना ९ मार्च रोजी सकाळी ११:२५ दरम्यान घडले या प्रकरणाची फिर्याद ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे कार्यरत असलेल्या ३५ वर्षीय महिला वैद्यकिय अधिकाऱ्याने दिली. या फिर्यादीत त्यांनी म्हटले आहे की, सदर फिर्यादी महिला वैद्यकिय अधिकाऱ्याच्या मुलास ताप आल्यामुळे त्या दिवशी कामावर येण्यास थोडासा उशीर झाला त्यामुळे रुग्णालयात उपचारासाठी गर्दी वाढली. येथे कार्यरत असलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्याने ओपीडी चालू करून रुग्ण तपासण्याचे काम चालू होते दरम्यान फिर्यादी कामावर हजर झाल्यानंतर सोमनाथ माळी यांनी मोठमोठ्याने ओरडून अर्वाच्च भाषेत शिव्या देऊन गोंधळ सुरू केला. माझ्याच कार्यालयात विनापरवाना प्रवेश करून तुला कपडे काढून चपलेने मारले पाहिजे व तू पेशंट कसे तपासते मी बघतो म्हणून शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद केले.

**गुन्हा दाखल**

### तिसरा डोळा


– प्रकाश पोरे



आज ऊन थोडं जास्तच आहे..!

कल्याण
135-96-169

मेन बाजार
369-89-225



## 'नाटू नाटू' गाण्याची ऑस्करमध्ये बाजी

### 'द एलिफंट विस्परर्स' ठरली सर्वोत्कृष्ट डॉक्यूमेंट्री

**मुंबई** : 'ऑस्कर २०२३'मध्ये भारताने इतिहास रचला आहे. तब्बल २१ वर्षानंतर ९५ व्या अकॅडमी अवॉर्ड्समध्ये भारताची मान पुन्हा एकदा उंचावली आहे. भारतीय सिनेसृष्टीने अभिमानास्पद कामगिरी करत 'ऑस्कर २०२३'मध्ये बाजी मारली आहे. भारताच्या 'द एलिफंट विस्परर्स' या माहिटीपटाने 'ऑस्कर २०२३'मध्ये सर्वोत्कृष्ट ड्राक्युमेंट्री शॉर्ट फिल्मचा पुरस्कार पटकावला आहे. दुसरीकडे राजामौलींच्या बहुचर्चित 'आरआरआर' या सिनेमातील 'नाटू नाटू' या गाण्याने बेस्ट ओरिजनल सॉन्ग या श्रेणीमध्ये ऑस्कर पटकावला आहे. 'ऑस्कर' हा सिनेसृष्टीतील सर्वात प्रतिष्ठीत पुरस्कार मानला जातो. हा पुरस्कार पटकावणं हे जगातील जवळपास प्रत्येक सिनेकलाकाराचं स्वप्न असतं. अर्थात प्रत्येक कलाकाराचं हे स्वप्न पूर्ण होतंच असं नाही. मग अशा वेळी तो कलाकार किमान ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात हजेरी लावता यावी हे दुय्यम स्वप्न पाहू लागतो. पण तरी अनेक वर्षांनंतर यंदा भारताच्या तीन सिनेमांना ऑस्करमध्ये नामांकन मिळालं. त्यापैकी दोन सिनेमांनी बाजी मारली आहे. आरआरआर हा २४ मार्च २०२२ रोजी रिलीज झाला होता. या चित्रपटाने केवळ भारतातच नाही तर जगभरातील बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटात राम चरण आणि ज्युनियर एनटीआर यांच्यासोबतच आलिया भट्ट आणि अजय देवगण यांनी देखील प्रमुख भूमिका साकारली.

### 'ऑस्कर'मध्ये दिसली भारताच्या 'नाटू-नाटू'ची धूम

'ऑस्कर'मध्ये दिसली भारताच्या 'नाटू-नाटू' या बहुचर्चित गाण्याची धूम पाहायला मिळाली आहे. या पुरस्कार सोहळ्यात काल भैरव आणि राहुल सिपलीगुंज गाणं गायलं. त्यांच्या गायनाला प्रेक्षकांनी चांगलीच दाद दिली आहे. या गाण्यासाठी त्यांना 'स्टँडिंग ओव्हेशन'देखील मिळालं.



## संपात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करणार : भांगे

सुराज्य/सोलापूर

१४ मार्च पासूनच्या संपात सहभागी होणाऱ्या शासकिय-निमशासकिय कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे राज्य शासनाचे सचिव सुमंत भांगे (साविस) यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

राज्य शासकिय कर्मचारी त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी १४ मार्च २०२३ पासून राज्यव्यापी बेमुदत संप करण्याची नोटीस शासनास दिली आहे. या संपात राज्यातील राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र, राज्य सरकारी- निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र या संघटना सहभागी आहेत.

या संपामध्ये राज्य शासकिय-निमशासकिय कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्यातील सर्व शासकिय कर्मचाऱ्यांनी आपला संप मागे घ्यावा व जनतेची कोणत्याही प्रकारची गैरसोय होवू नये म्हणून शासकिय कामकाज न थांबवता योग्य मार्गाने आपल्या मागण्या शासनापुढे मांडाव्यात, असे आवाहन शासनाने केले आहे, असेही सचिव भांगे यांनी म्हटले आहे.